# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ८२-२२** **दिनांक - ११/०३/२०२२**

## श्री साई रिजन्सी लॉजवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक १०.०३.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध भाईंदर पथकाचे वपोनि. श्री. पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, श्री साई रिजन्सी लॉजींग आणि बोर्डींग, इंद्रलोक नाका, नवघर, भाईंदर पूर्व या लॉजिंगचे मॅनेजर/वेटर हे पुरुष गि-हाईकांनी वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केल्यास ते गि-हाईकांना व्हॉटसॲपवर मुलींचे फोटो पाठवून वेश्यागमनाची रक्कम ठरवून वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना श्री साई रिजन्सी लॉजींग आणि बोर्डींग, इंद्रलोक नाका, नवघर, भाईंदर पूर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह १३.०५ वा. छापा टाकला असता श्री साई रिजन्सी लॉजचे व्यवस्थापक श्रीनिवास उर्फ श्रीकांत सुवर्णा याने बोगस गि-हाईकाकडुन वेश्यागमनाच्या मोबदला वेश्यागमनाकरीता मुलगी पुरविल्याचे निष्पन्न झाल्याने पिडित मुलीची सुटका करुन श्री साई रिजन्सी लॉजिंग आणि बोर्डिंगचे व्यवस्थापक १) श्रीकांत उर्फ श्रीनिवास कृष्णा सुवर्णा वय ४६ वर्ष वेटर-२) दिनेश कुमार रुपलाल प्रसाद वय ३५ वर्ष ३) मनोजकुमार दिलचंद यादव वय ४५ वर्ष, ४) दिनेशकुमार अर्जुन भुईय्या वय ३४ वर्ष व ५) इश्वर बाजु महतो वय ३३ वर्ष व पाहिजे आरोपी चालक/मालक १) श्री शर्शींद्र शेटटी २) देव ३) मनमत शेटटी ४) गणेश शेटटी ५) निशु शेटटी ६) नारायण शेटटी यांचे विरुध्द पोहवा/९२०३३ उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I १७४/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पो.हवा./९२०३३ उमेश पाटील, पोहवा/९२०१९ विजय निलंगे, पोशि/१२११८ केशव शिंदे, मपोना/०३०१५ वैष्णवी यंबर व चा.पोना/०६१०६ गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.